# डोनाल्ड ट्रम्प यांचे ‘टॅरिफराज’ !

## आयातशुल्काला उत्तर देण्याची मेक्सिको, कॅनडा, चीनची घोषणा

**वृत्तसंस्था, वॉशिंग्टन**

**अमेरिकेचे अध्यक्ष** डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅनडा, मेक्सिको आणि चीनवर आयातशुल्क लागू करण्याची दीर्घकाळापासून दिलेली धमकी सोमवारी मध्यरात्रीनंतर अंमलात आली. ‘मेक्सिको आणि कॅनडामधील वस्तूंवर कोणत्याही विलंबाविना २५ टक्के आयातशुल्क वसुलीला मंगळवारपासून सुरुवात होईल, त्यात कोणताही विलंब होणार नाही’ असे ट्रम्प यांनी जाहीर केले.

चिनी मालावर फेब्रुवारीमध्ये १० टक्के कर लागू करण्यात आला होता, तो मंगळवारपासून २० टक्के इतका झाला असून प्रत्युत्तरादाखल चीनने विविध प्रकारच्या अमेरिकी मालांवर १५ टक्के आयातशुल्क लादण्याचे जाहीर केले. तर कॅनडा आणि मेक्सिकोनेही अमेरिकी मालावर परस्परशुल्क लादण्याची घोषणा केली.

फेन्टानिल या अंमली पदार्थाची तस्करी आणि बेकायदा स्थलांतराविरोधात या देशांनी आपला लढा अधिक तीव्र करावा, यासाठी ही करवाढ केल्याचा पुनरुच्चार ट्रम्प यांनी केला. अमेरिकेबरोबरील व्यापाराचे असंतुलनही आपल्याला संपुष्टात आणायचे आहे, असेही ट्रम्प म्हणाले. मात्र, या करवाढीमुळे महागाई वाढून विकास घटण्याची शक्यता असल्याचा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.

ट्रम्प म्हणाले, ‘‘कॅनडा आणि मेक्सिकोवर २५ टक्के करवसुलीला उद्यापासून (मंगळवारपासून) सुरुवात होईल. त्यांना कर द्यावाच लागेल.’’ ट्रम्प यांच्या घोषणेनंतर अमेरिकी बाजार कोसळला. ट्रम्प यांच्या या निर्णयांमुळे महागाईच्या फटक्याबरोबरच कॅनडा आणि मेक्सिकोबरोबर दीर्घ काळापासून सुरू असलेल्या व्यापारालाही तडा जाणार आहे. मात्र, करवाढीमुळे अमेरिकेतील उत्पादनवाढीला चालना मिळेल, असा विश्वास ट्रम्प प्रशासनाला आहे. कॅनडा आणि मेक्सिकोने सवलतीचे गाजर अमेरिकेला दाखविल्यामुळे फेब्रुवारी करवाढीचा घेतलेला निर्णय लागू करण्यात आला नव्हता. मात्र, आता कुठल्याही प्रकारची जागा या दोन्ही देशांनी शिल्लक ठेवली नसल्याचे सांगून ट्रम्प यांनी करवाढीच्या निर्णयाची घोषणा केली.

कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनी ट्रम्प यांच्या निर्णयावर कुठलेही स्पष्टीकरण नसल्याची प्रतिक्रिया दिली आहे. तर मेक्सिकोच्या अध्यक्ष क्लॉडिया शिनबाऊम यांनीही अमेरिकेच्या निर्णयाला लवकरच जाहीर उत्तर दिले जाईल असे सांगितले. यामुळे व्यापारयुद्ध भडकण्याची भीती आहे.

**अमेरिकी भांडवल बाजारावर परिणाम**

न्यूयॉर्क : अमेरिका आणि मेक्सिको, कॅनडा, चीन या देशांमध्ये भडकलेल्या व्यापारयुद्धाचा परिणाम अमेरिकेच्या भांडवली बाजारावरही झाला. बांधकाम व्यवसाय आणि विद्युत, ऊर्जा क्षेत्रातील कंपन्यांचा अपवाद वगळता बहुतांश सर्व क्षेत्रांमधील कंपन्यांचा निर्देशांक कोसळला. निवडणूक निकालापासून ‘एसअँडपी ५००’मधील वाढीमुळे झालेला सर्व नफा त्यामध्ये धुवून निघाला. ‘एसअँडपी ५००’ १.४ टक्क्यांनी घटला. ‘डाऊ जोन्स इंडस्ट्रियल ॲव्हरेज’ १.३ टक्क्यांनी म्हणजे ५८० अंकांनी घसरला. तर नासडॅकमध्येही १.४ टक्के घट झाली.



आतापर्यंतचे नेते एकतर अप्रामाणिक होते, मूर्ख होते किंवा त्यांना त्यासाठी मोबदला मिळत होता, त्यामुळे त्यांनी या (आयातशुल्क) शक्तिशाली हत्याराचा वापर केला नव्हता. आता आम्ही तो वापरत आहोत.
**- डोनाल्ड ट्रम्प,** अध्यक्ष, अमेरिका



अमेरिकेने करवाढ लादल्यामुळे अमेरिकी लोकांना गॅस, कार, काचेच्या वस्तू महाग मिळतील. तसेच हजारो नोकऱ्या जातील. करवाढीमुळे व्यापारी संबंधही खराब होतील. कॅनडादेखील २५ टक्के कर लावून अमेरिकेला प्रत्युत्तर देईल.
**- जस्टिन ट्रुडो,** पंतप्रधान, कॅनडा



अमेरिकेच्या निर्णयाला आम्ही आमच्या पद्धतीने उत्तर देऊ. आम्हीही अमेरिकी मालावर आमच्या नियमांनुसार आयातशुल्क लागू करू. मेक्सिको शहरात रविवारी एका सार्वजनिक कार्यक्रमात याबद्दल घोषणा केली जाईल.
**- क्लॉडिया शिनबाऊ,** अध्यक्ष, मेक्सिको

### कर नेमके लागू कसे होतात ?

- परकीय वस्तूंच्या किमतींवर काही टक्के रक्कम आयात केलेल्या देशातील खरेदीदार शुल्करूपात कर म्हणून परकी विक्रेत्याला देतो. अमेरिकेत ३२८ बंदरांवर जकात आणि सीमा संरक्षण खात्याकडून करवसुली केली जाते.
- विविध वस्तूंवर विविध टक्क्यांचे कर असतात. उदा. अमेरिका सामान्यतः प्रवास कारवर अडीच टक्के, तर गोल्फच्या बुटांवर ६ टक्के आयातशुल्क लावते.
- अमेरिकेचे ज्या देशांबरोबर व्यापारी करार आहे, त्यांच्याबरोबर आयातकर कमी असू शकतात.
- अमेरिकेने मेक्सिको, कॅनडावरील वस्तूंवर २५ टक्के आयातशुल्क लावले असले, तरी अमेरिका-मेक्सिको-कॅनडा करारानुसार बहुतेक वस्तूंवर कर लागू नाही.
- आयातशुल्क आयातदार भरतात. उदा. अमेरिकी कंपन्यांकडून काही वस्तू आयात केल्या जात असतील, तर कर अमेरिकी कंपन्या भरतात आणि त्याचा बोजा ग्राहकांवर टाकतात. परिणामी वस्तूंच्या किमतींमध्ये वाढ होते.
- असे असले, तरी आपले उत्पादन महाग होत असल्याने त्याची परदेशात खरेदी होण्याची शक्यता कमी राहते. त्यामुळे निर्यात करणाऱ्या देशालाही त्याचा फटका बसतो.

## चीनची ‘डब्ल्यूटीओ’कडे धाव

**पीटीआय, बीजिंग**



**अमेरिकेच्या आयातशुल्क** धोरणाला चीनने प्रत्युत्तर दिले असून, अमेरिकेच्या काही वस्तूंवर अतिरिक्त १५ टक्के आयातशुल्क लावण्याची घोषणा केली. तसेच, जागतिक व्यापार संघटनेमध्ये (डब्ल्यूटीओ) अमेरिकेविरोधात कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे. अमेरिकेने चीनच्या वस्तूंवर अतिरिक्त १० टक्के शुल्क लावल्यानंतर चीनने हे पाऊल उचलले आहे. याची अंमलबजावणी १० मार्चपासून होणार आहे.

चीनच्या जकात कर आयोगाने ही माहिती दिली. अतिरिक्त १५ टक्के शुल्क अमेरिकेतून आयात केलेले चिकन, गहू, मका आणि कापसावर लागू करण्यात आले आहे. याखेरीज, सोयाबीन, पोर्क, बीफ, ज्वारी, फळे, भाज्या, डेअरी उत्पादने यांच्यावर अतिरिक्त १० टक्के आयातशुल्क लावण्यात आले आहे. तसेच चीनने अमेरिकेच्या १० कंपन्यांना अविश्वासू म्हणून गणले आहे आणि त्यानुसार उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. यामध्ये संरक्षण आणि सुरक्षेशी संबंधित कंपन्यांबरोबरच एआय, हवाई क्षेत्र, आयटी अशा क्षेत्रांतील कंपन्यांचाही समावेश आहे.

चीनने अमेरिकेविरुद्ध ‘डब्ल्यूटीओ’मध्ये कायदेशीर दाद मागितली आहे. अमेरिकेने करवाढ केल्याच्या विरोधात चीनने ही दाद मागितली आहे. अमेरिकेने एकतर्फी करवाढ करून बहुस्तरावरील व्यापारी यंत्रणेकडे दुर्लक्ष केले असून, अमेरिकी व्यापार आणि ग्राहकांवरील बोजा वाढविल्याचे आणि चीन-अमेरिका आर्थिक आणि व्यापारी सहकार्यालाही यामुळे तडा गेल्याचे आयोगाने म्हटले आहे.



## ‘घडले ते खेदजनक’

### अमेरिकेने लष्करी मदत बंद केल्यानंतर झेलेन्स्की यांचा मवाळ सूर

**वृत्तसंस्था, कीव्ह/ वॉशिंग्टन**

**अमेरिकेचे अध्यक्ष** डोनाल्ड ट्रम्प यांच्याबरोबर ओव्हल कार्यालयात झालेली खडाजंगी खेदजनक होती असे युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी मंगळवारी सांगितले. इतकेच नाही तर युक्रेनमध्ये कायमस्वरूपी शांतता टिकवण्यासाठी आपण ट्रम्प यांच्या कणखर नेतृत्वात काम करायला तयार असल्याचेही त्यांनी ‘एक्स’वरील पोस्टमध्ये लिहिले.

ट्रम्प यांनी युक्रेनची सर्व लष्करी मदत तात्पुरत्या काळासाठी थांबवल्यानंतर काहीच तासांनी झेलेन्स्की यांनी नमती भूमिका घेतली. अमेरिकेच्या आर्थिक सहाय्याशिवाय रशियाबरोबरच्या युद्धामध्ये टिकून राहणे युक्रेनसाठी अशक्य असल्याचे मानले जाते. झेलेन्स्की यांनी लिहिले की, ‘‘वॉशिंग्टनमध्ये व्हाइट हाऊस येथे शुक्रवारी झालेली आमची बैठक आम्हाला हव्या त्या पद्धतीने पार पडली नाही. जे घडले ते खेदजनक आहे. ही वेळ बिघडलेली परिस्थिती सुधारण्याची आहे. आमचे भविष्यातील सहकार्य आणि संभाषण रचनात्मक असेल याची आम्ही खबरदारी घेऊ.’’

ट्रम्प सरकारला हवा असलेला दुर्मीळ संयुगे विक्री करार करण्याची तयारी झेलेन्स्की यांनी दर्शवली. ‘‘आपणा कोणालाही न संपणारे युद्ध नको आहे. शांततेसाठी युक्रेन शक्य तितक्या लवकर वाटाघाटी करायला तयार आहे. ट्रम्प यांच्या मजबूत नेतृत्वाखाली मी आणि माझे सहकारी काम करायला तयार आहोत,’’ असे झेलेन्स्की यांनी स्पष्ट केले.

युक्रेन रशियाबरोबर शांतता प्रक्रिया राबविण्यास कटिबद्ध दिसत नाही, तोपर्यंत अमेरिकेची युक्रेनला मदत बंद राहील असे ट्रम्प प्रशासनाकडून सांगण्यात आले. या निर्णयामुळे युक्रेनला एक अब्ज डॉलरहून अधिक शस्त्रे आणि दारुगोळ्याच्या पुरवठा थांबणार आहे. ‘युक्रेन सिक्युरिटी आसिस्टन्स इनिशिएटिव्ह’ अंतर्गत युक्रेनला देण्यात येत असलेले कोट्यवधी डॉलरची मदतही थांबविण्यात आली.

रशियाने युक्रेनवर २४ फेब्रुवारी २०२२ रोजी केलेल्या हल्ल्यानंतर अमेरिकेने युक्रेनला आजपर्यंत ६५.९ अब्ज डॉलरचे लष्करी सहाय्य केले आहे.

## शंकानिरसनावर आयोगाचा भर

**नवी दिल्ली :** राजकीय पक्षांकडून विशेषतः विरोधकांकडून सातत्याने होत असलेल्या आरोपांची गंभीर दखल मंगळवारी केंद्रीय निवडणूक आयोगाने दिल्लीतील दोन दिवसांच्या निवडणूक अधिकाऱ्यांच्या देशव्यापी परिषदेत घेतली.

राज्य तसेच, जिल्हा स्तरावर राजकीय पक्षांबरोबर नियमित बैठका घेऊन त्यांच्या तक्रारींचे पारदर्शीपणे शंकानिरसन केले पाहिजे. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी विनंती केल्यानंतर त्यांना पुरेसा वेळ दिला पाहिजे तसेच, त्यांचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे, अशा महत्त्वपूर्ण सूचना केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी परिषदेत केल्या.

निवारण केलेल्या तक्रारींसंदर्भातील कृती अहवाल निवडणूक अधिकाऱ्यांनी ३१ मार्चपर्यंत आयोगाला सादर करावेत, असा आदेशही मुख्य केंद्रीय निवडणूक आयुक्तांनी दिला.

## ‘भारत जगाचा विश्वासू भागीदार’

**पीटीआय, नवी दिल्ली**

**संपूर्ण जग** भारताकडे विश्वासू भागीदार म्हणून पाहात असताना देशातील उद्योग क्षेत्राने जागतिक संधींचा फायदा घ्यायला हवा, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी केले. नियामक, गुंतवणूक आणि ‘इज ऑफ डुइंग बिझिनेस’वरील अर्थसंकल्पोत्तर वेबिनारला संबोधित करताना मोदी यांनी उद्योजकांना मोठी भरारी घेण्यास सांगितले. उत्पादन आणि निर्यातीला चालना देण्यासाठी केंद्र सरकार दोन मोहिमा आखत असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

जागतिक मागणी पूर्ण करण्यासाठी देशामध्ये कोणत्या नवीन उत्पादनांचे उत्पादन घेतले जाऊ शकते याचा उद्योजकांनी विचार केला पाहिजे असे मोदी यांनी सुचवले. ते म्हणाले, ‘‘आपला देश हे करू शकतो, तुम्ही करू शकता, ही आपल्यासाठी मोठी संधी आहे. उद्योग क्षेत्राने जगाच्या अपेक्षांकडे केवळ प्रेक्षक म्हणून पाहू नये अशी माझी इच्छा आहे. तुम्ही स्वतःसाठी संधी शोधायला हवी.’’

देशभरातील सहा कोटी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना वेळेत, कमी दराने कर्जपुरवठा करण्यासाठी कर्ज वितरणाच्या नवीन पद्धती विकसित करण्याची गरज असल्याचे मोदी यांनी यावेळी सांगितले. पहिल्या पिढीतील महिला आणि अनुसूचित जाती-जमातींच्या नवउद्यमींना दोन कोटींपर्यंत कर्जपुरवठा या तरतुदीचा त्यांनी पुनरुच्चार केला. उद्योग क्षेत्राला नवीन आत्मविश्वास मिळाला आहे, असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला.

## भारतीयाचा मृतदेह परत आणण्याची विनंती

**तिरुवअनंतपुरम :** जॉर्डनमध्ये गेल्या महिन्यात मारल्या गेलेल्या भारतीयाचा मृतदेह परत आणण्यासाठी परराष्ट्र मंत्रालयाने हस्तक्षेप करावा अशी विनंती काँग्रेस खासदार शशी थरूर आणि भाजपचे नेते व्ही मुरलीधरन यांनी मंगळवारी केली. मूळचे केरळच्या थुंबा येथील रहिवासी असलेले ॲनी थॉमस गॅब्रियल १० फेब्रुवारीला इस्रायल-जॉर्डन सीमेवर सुरक्षा दलांच्या गोळीबारात मारले गेले.

एका वृत्तानुसार गॅब्रियल, त्यांचा नातेवाईक एडिसन आणि अन्य दोघेजण तीन महिन्यांच्या व्हिसावर जॉर्डनला गेले होते. ते चौघेही एका एजंटच्या मदतीने सीमा पार करून इस्रायलमध्ये जाण्याचा प्रयत्न करत होते. त्यावेळी जॉर्डनच्या सुरक्षा दलांनी केलेल्या गोळीबारात गॅब्रियल मरण पावले तर एडिसन जखमी झाले. माजी परराष्ट्रराज्यमंत्री व्ही मुरलीधरन यांनी मंगळवारी गॅब्रियल यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. काँग्रेसचे नेते शशी थरूर यांनीही गॅब्रियल यांचा मृतदेह परत आणण्यासाठी परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी हस्तक्षेप करण्याची विनंती केली.



गुजरातच्या जामनगर जिल्ह्यातील ‘वनतारा’ या प्राणी बचाव, संवर्धन आणि पुनर्वसन केंद्राची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी प्रशंसा केली. त्यांनी रविवारी या केंद्राला भेट दिली होती.


**मुंबई पत्तन प्राधिकरण**

**निविदा आमंत्रण सूचना**

तारीखः ०५/०३/२०२५

मुंबई पत्तन प्राधिकरणाच्या सीएमसी इमारतीच्या तळमजल्यावर ०३ ठिकाणी ११ महिन्यांच्या परवाना आधारावर ३० चौरस मीटर, ३० चौरस मीटर आणि २० चौरस मीटर मोज-माप असलेली ड्युटी फ्री दुकाने उभारण्यासाठी जागेच्या वाटपासाठी ऑनलाइन ई-निविदा-सह-ई-लिलाव मागविण्यात येत आहे, जे मुंबई पत्तनाच्या विवेकबुद्धीनुसार पुढील ११ महिन्यांच्या कालावधीसाठी परवाना नूतनीकरण करता येईल.

वरील निविदा एमबीपीएच्या वेबसाइट https://www.mumbaiport.gov.in आणि ई-प्रोक्युरमेंट वेबसाइट https://eprocure.gov.in वर तारीख ०५/०३/२०२५ रोजी ११:०० वाजल्यापासून तारीख २६/०३/२०२५ रोजी १५:०० वाजेपर्यंत डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे.

निविदा ऑनलाइन सादर करण्याची अंतिम तारीख २६/०३/२०२५ रोजी १५:०० वाजता आहे. तांत्रिक बोली २७/०३/२०२५ रोजी १५:३० वाजता उघडली जाईल.

MbPA-25-2025 — ट्रॅफिक मॅनेजर

**जाहीर सूचना**

आमच्या लक्षात आले आहे की, श्री. विकी कौशल, कु. रश्मिका मंदाना यांच्या प्रमुख भूमिका असलेला, लक्ष्मण उतेकर, ऋषी विरमाणी, कौस्तुभ सावरकर आणि उन्मान बनकर यांनी सहलिखित केलेला आणि लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित (‘चित्रपट’) हा आमचा हिंदी भाषेतील पूर्ण लांबीचा चित्रपट, दि. १४ फेब्रुवारी २०२५ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला, तो महाराष्ट्रातील विविध ठिकाणी आमच्या संमतीशिवाय आणि अधिकाराशिवाय लोकांसाठी पायरेट करून प्रदर्शित केला जात आहे. अशाप्रकारची पायरसी आणि स्क्रीनिंग बेकायदेशीर आणि अवैध आहेत.

माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० च्या कलम ६६, भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम ३१६ आणि कलम ३१८ सहवाचता कॉपीराइट कायदा, १९५७ च्या कलम ५१ आणि कलम ४३ सहवाचता सिनेमॅटोग्राफ कायदा, १९५२ च्या कलम ६एबी, कलम ६३, ६३-अ, ६५ आणि ६५-अ यासह परंतु, त्यापुरते मर्यादित नाही. यानुसार अशा बेकायदेशीर आणि अवैध पायरसी आणि चित्रपटाच्या स्क्रीनिंगमध्ये सहभागी असलेल्या आणि/किंवा त्यांच्याशी संबंधित असलेल्या सर्व व्यक्ती, चित्रपटाच्या अशा बेकायदेशीर आणि अवैध प्रदर्शनाला उपस्थित राहणाऱ्या व्यक्तींसहित, भारतीय कायद्यांतर्गत गुन्ह्यांसाठी जबाबदार असतील, या सर्वांचे गंभीर परिणाम आहेत.

चित्रपटाचे निर्माते अशा सर्व गुन्हेगारांविरुद्ध कठोर कारवाई सुरू करण्याच्या प्रक्रियेत आहेत. म्हणून आम्ही सर्वसामान्यांना सूचना देतो की, चित्रपटाच्या कोणत्याही प्रदर्शनाला उपस्थित राहू नका, जोपर्यंत ते अधिकृत थिएटर/मल्टीप्लेक्समधून होत नाही.

**ठिकाण : मुंबई.** **सही/-**
**दिनांक : ०५ मार्च २०२५** **मॅडॉक फिल्म्स प्रा. लि.**

CHHAAVA

**महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड**

(भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांचा संयुक्त उपक्रम)
'मेट्रो भवन', व्हीआयपी रोड, दीक्षाभूमी जवळ,
रामदासपेठ, नागपूर-440010.
टेलिफॅक्स : 0712-2812300, वेबसाईट : www.mahametro.org

ADVT NO: MAHA-Metro/N/HR/01/2025 Date: 04/03/2025

मेट्रो रेल / रेल्वे / रेल्वे पीएसयु / शासकीय संस्था तसेच मेट्रो संबंधीत पायाभूत उद्योगांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांची करार / प्रतिनियुक्तीवर तीन वर्षांच्या कालावधीसाठी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड अंतर्गत नागपूर मेट्रो रेल प्रकल्प, नवी मुंबई मेट्रो लाईन -1 आणि ठाणे इंटीग्रल रिंग मेट्रो रेल प्रकल्पाच्या विविध विभागांकरिता आवश्यकता आहे.

| अनु क्र. | पदाचे नाव (पद कोड) | रिक्त पदांची संख्या | वेतन श्रेणी (IDA) ₹ |
|---|---|---|---|
| 1. | मुख्य प्रकल्प व्यवस्थापक (सिव्हिल/समन्वय) ई-7 | 01 (UR-01) | 1,20,000-2,80,000/- |
| 2. | महाव्यवस्थापक (मानव संसाधन) ई-7 | 01 (UR-01) | 1,20,000-2,80,000/- |
| 3. | व्यवस्थापक (मानव संसाधन) ई-2 | 01 (UR-01) | 60,000-1,80,000/- |
| 4. | व्यवस्थापक (सिव्हिल / ट्रॅक) ई-2 | 01 (UR-01) | 60,000-1,80,000/- |
| 5. | सहाय्यक व्यवस्थापक (मानव संसाधन) ई-1 | 01 (UR-01) | 50,000-1,60,000/- |
| 6. | सहाय्यक व्यवस्थापक (सिव्हिल / करार) ई-1 | 01 (UR-01) | 50,000-1,60,000/- |

**महत्वाचे : (1)** वरील जाहिरातीतील पदांसाठी आवश्यक अर्हता / अनुभव, कमाल वयोमर्यादा, अर्ज कसा करावा याचा तपशील इ. महा-मेट्रोच्या **www.mahametro.org, under career heading** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. **(2)** जाहिरातीत दर्शवल्याप्रमाणे ऑफलाइन पद्धतीने उमेदवाराला अर्ज करावा लागेल.

**महाव्यवस्थापक (मानव संसाधन), महा-मेट्रो**

Nagpur Metro : A Safe Journey

**SICOM LIMITED**

**नोंदणीकृत कार्यालय :** सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, इमारत क्र. ४, ६वा मजला, गुरू हरगोविंदजी रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०९३.
**टेलि. क्र. :** ०२२-६६५७२७००, **वेबसाइट :** www.sicomindia.com

**जाहीर ई-लिलाव सूचना**

**‘‘जसे आहे, जे आहे, जे काही आहे ते आणि कोणत्याही आधाराशिवाय’’ यावर ‘‘कमला लॅण्डमार्क प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड’’ यांच्या मालमत्तेच्या विक्रीसाठी**

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदारांना/ जामीनदारांना सिकॉम लिमिटेड यांच्याकडून सूचना देण्यात येत आहे ती, सिकॉम लिमिटेड यांना गहाण ठेवलेली खाली नमूद केलेली मालमत्ता, ज्यावर सिकॉम यांचा विशेष अधिकार आहे, ती राज्य वित्तीय महामंडळ कायदा, १९५१ (एसएफसी कायदा)च्या कलम २९(१)च्या तरतुदींनुसार ताब्यात घेण्यात आली आहे आणि सिकॉम यांची थकबाकी वसूल करण्यासाठी **दि. २५ मार्च २०२५ रोजी सकाळी ११.०० वा. ते दुपारी ०१.०० वाजेपर्यंत https://eauction.auctiontiger.net** या वेबसाइटवर ई-लिलावाद्वारे **मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ‘‘जसे आहे तिथे आहे, जसे आहे जे आहे, जे आहे तेथे आहे आणि कोणत्याही आधाराशिवाय’’** या आधारावर जाहीर ई-लिलावाद्वारे विक्री केली जाईल. खाली नमूद केलेल्या मालमत्तेबाबतीत इच्छुक पक्षांकडून राष्ट्रीयीकृत बँक/ शेड्यूल्ड कमर्शियल बँकेच्या डिमाण्ड ड्राफ्ट किंवा एनईएफटी/ आरटीजीएसद्वारे देय असलेल्या इसारा ठेव अनामत (ईएमडी)सह मोहोरबंद लिफाफ्यात प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. एसएफसी कायद्याच्या कलम २९(१) अंतर्गत विक्रीसाठी ठेवलेल्या मालमतेचे संक्षिप्त वर्णन.

*जमीन किंवा जमिनीवरील प्लॉट क्र. १७/अ, महल औद्योगिक वसाहत, मूळगाव गावातील सीटीएस क्र. ४६/५ असलेला मोजमापे २०९७.७२ चौ. यार्डचा आकार किंवा सुमारे मोजमापे १७५३.९५ चौ.मी. किंवा महाकाली केव्हज रोड, मुंबई-४०० ०९३ येथे स्थित, मुंबई शहराच्या नोंदणी जिल्ह्यात आणि उपजिल्ह्यात आणि त्यावर उभ्या असलेल्या इमारती आणि संरचनांसह किंवा त्यावरील बांधण्यासाठी युनिट क्र. ५०२ वगळता याचे ते सर्व तुकडे आणि खालीलप्रमाणे सीमाबद्ध : **उत्तरेकडे** किंवा त्या दिशेने : प्लॉट क्र. १८/अ सी.टी.एस. क्र. ६/३ असलेली मालमत्ता, **दक्षिणेकडे** किंवा दिशेने : रस्ता, **पूर्वेकडे** किंवा दिशेने : सीटीएस क्र. ४७ आणि ४८ असलेली मालमत्ता, **पश्चिमेकडे** किंवा दिशेने : प्लॉट क्र. १७/ब, सीटीएस असलेली मालमत्ता क्र. ४६/४.

**(कमला लॅण्डमार्क प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड)- दि. ३१.०१.२०२५ पर्यंत सिकॉमची थकबाकी स्थिती.**

| थकबाकी असलेली मुदत (रु. कोटींमध्ये) | व्याज थकबाकी (रु. कोटींमध्ये) | एकूण थकबाकी (रु. कोटींमध्ये) |
|---|---|---|
| ५०.०० | ३६३.५५ | ४१३.५५ |

***वर उल्लेख केलेली मालमत्ता ही कमला लॅण्डमार्क कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड यांना दिलेल्या कर्जासाठी समतुल्य आहे. (दि. ३१.०१.२०२५ रोजीनुसार एकूण थकबाकी- रु. १७५.६५ कोटी) आणि कमला रिअल इस्टेट हब प्रायव्हेट लिमिटेड (दि. ३१.०१.२०२५ रोजीनुसार एकूण थकबाकी- रु. २७७.२० कोटी).**

| आरक्षित किंमत | इसारा ठेव अनामत | मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ | प्रस्ताव सादर करण्याची शेवटची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|
| **रु. ४३.०५ कोटी** | **रु. ४.३० कोटी** | दि. १९ मार्च २०२५, स. ११.०० वा. ते दु. ०४.०० दरम्यान | दि. २४ मार्च २०२५, दु. ०४.०० वाजेपर्यंत | दि. २५ मार्च २०२५ रोजी स. ११.०० वा. ते दु. ०१.०० दरम्यान https://eauction.auctiontiger.net यावर |

**-: लिलावाच्या अटी आणि शर्ती :-**

१. **मुंबई उच्च न्यायालयाच्या दिनांकित १९ एप्रिल २०२३ रोजीच्या आदेशानुसार, कंपनी याचिका क्र. ६५, २०१६ मधील अंतरिम अर्ज क्रमांक १३२१, २०१९च्या आदेशानुसार ही मालमत्ता विक्री केली जात आहे.**
२. **सदर ही विक्री सिकॉम लिमिटेड आणि माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या प्रस्तावाच्या स्वीकृतीच्या अधीन आहे.**
३. बोलीत वाढ केलेली रक्कम रु. ५,००,०००/- आणि त्याच्या पटीत असेल.
४. संभाव्य बोलीदारांना सेवा प्रदाता **मेसर्स ई-प्रोक्योरमेन्ट टेक्नॉलॉजीज लिमिटेड (ऑक्शन टायगर)** यांच्याकडून ऑनलाइन प्रशिक्षण घेता येईल- श्री. राम शर्मा (मोबाइल क्र. ८०००२३२९७, ई-मेल आयडी- ramprasad@auctiontiger.net, हेल्पलाइन ई-मेल आयडी : support@auctiontiger.net.
५. संभाव्य बोलीदारांना त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी तपशीलवार अटी आणि शर्ती आणि विक्रीची प्रक्रिया पाहण्यासाठी https://eauction.auctiontiger.net ही वेबसाइट पाहण्याचा सल्ला देण्यात येत आहे. लिलाव विक्री वरील नमूद केलेल्या मालमत्तेच्या विक्रीच्या सामान्य अटी आणि शर्तींच्या अधीन आहे. ज्याची एक वेगळी प्रत बोलीदार www.sicomindia.com किंवा https://eauction.auctiontiger.net वरून मिळवू शकतात. जरी बोलीदाराला विक्रीच्या सामान्य अटी आणि शर्तींची प्रत मिळाली नाही, तरी असे गृहीत धरले जाईल की, बोलीदाराने ती मिळविली आहे, वाचली आहे, तपासणी आहे आणि स्वीकारली आहे.
६. जाहीर लिलावात सहभागी होण्यासाठी इच्छुक बोलीदार/ प्रस्ताव करणारे राष्ट्रीयीकृत बँक/ शेड्यूल्ड कमर्शियल बँकेत सिकॉम लिमिटेड यांच्या नावे काढलेल्या डिमाण्ड ड्राफ्टद्वारे **रु. ४.३० कोटींची इसारा ठेव अनामत (ईएमडी) दि. २४ मार्च २०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजेपर्यंत** मुंबई येथे देय स्वरूपात जमा करावी लागेल.
७. खाली दिलेल्या वेळापत्रकानुसार **दि. २४ मार्च २०२५ पर्यंत दुपारी ०४.०० वाजेपर्यंत** आरटीजीएस/ एनईएफटीद्वारे ईएमडी खात्यात जमा करता येईल.

| | |
|---|---|
| **लाभार्थ्याचे नाव** | **सिकॉम लिमिटेड** |
| **लाभार्थी बँकेचे नाव** | **एचडीएफसी बँक लिमिटेड** |
| **लाभार्थी खाते क्रमांक** | **५७५०००० १५०८८२३** |
| **शाखेचा पत्ता** | **एचडीएफसी बँक लिमिटेड, ग्राऊण्ड फ्लोअर, जहांगीर बिल्डिंग, एमजी रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.** |
| **आयएफएससी कोड** | **एचडीएफसी००००६०** |

८. संभाव्य बोलीदारांना खालील पेमेन्ट वेळापत्रकाचे पालन करण्याचा सल्ला देण्यात येत आहे :
   अ. प्रस्ताव रकमेच्या २५% अतिरिक्त रक्कम (वरीलप्रमाणे ईएमडी म्हणून दिलेली रक्कम कमी करून) तात्काळ भरावी लागेल किंवा सिकॉम यांनी विक्रीची पुष्टी केल्यानंतर, आरटीजीएस/ एनईएफटीद्वारे किंवा मुंबई येथे देय असलेल्या कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँक/ शेड्यूल्ड कमर्शियल बँकेवर काढलेल्या डिमाण्ड ड्राफ्टद्वारे, जी सिकॉम लिमिटेडच्या नावाने देय असेल, पुढील कामकाजाच्या दिवसापर्यंत भरावी लागेल.
   ब. खरेदी किमतीच्या ७५% रक्कम सिकॉम यांच्याद्वारे प्रस्ताव स्वीकारल्याच्या आणि पुष्टीकरणाच्या तारखेपासून १५ दिवस (पंधरा दिवस) किंवा त्यापूर्वी भरली जाईल आणि जर १५वा दिवस रविवार किंवा इतर सुट्टीचा दिवस असेल तर लगेचच्या पुढील कामकाजाच्या दिवशी.
९. ज्या प्रस्तावासोबत सामान्य अटी आणि शर्ती आणि आवश्यक ईएमडीची स्वीकृत आणि स्वाक्षरी केलेली प्रत किंवा येथे नमूद केलेल्या तारखेनंतर प्राप्त झालेला प्रस्ताव नसेल, ती वैध निविदा मानली जाणार नाही/ मानली जाणार नाही आणि त्यानुसार ती नाकारली जाईल.
१०. सिकॉम सर्वोच्च प्रस्ताव किंवा कोणताही प्रस्ताव स्वीकारण्यास बांधील नाही आणि ती तिच्या पूर्ण विवेकबुद्धीनुसार योग्य वाटेल त्याप्रमाणे कोणताही प्रस्ताव स्वीकारू शकते किंवा सर्व नाकारू शकते.
११. कोणतेही कारण न देता जाहीर लिलाव प्रक्रिया कोणत्याही क्षणी रद्द करण्याचा/ पुढे ढकलण्याचा अधिकार सिकॉम लि. राखून ठेवते.
१२. वरील गहाणखत असलेली मालमत्ता **‘‘जसे आहे तिथे आहे, जे आहे तसेच आहे, जे काही आहे ते, कोणत्याही आधाराशिवाय’’** या तत्त्वावर आणि कोणत्याही नुकसानभरपाई आणि हमीशिवाय विकली जात आहे.
१३. लिलावाच्या अटींनुसार यशस्वी बोलीदाराकडून संपूर्ण विक्री मोबदला प्राप्त झाल्यानंतर आणि कंपनी याचिका क्र. ६५, २०१६ मधील अंतरिम अर्ज क्र. १३२१, २०१९च्या दि. १९ एप्रिल २०२३च्या आदेशानुसार माननीय मुंबई उच्च न्यायालयाची मान्यता मिळाल्यानंतरच विक्री करार/ विक्री प्रमाणपत्र जारी केले जाईल.
१४. सिकॉम लि.च्या सर्वोत्कृष्ट माहिती आणि ज्ञानानुसार मालमत्तेवर कोणताही बोजा नाही. बोलीदाराने सर्व बाबींमध्ये स्वतःचे समाधान करावे, ज्यामध्ये कोणतेही शुल्क, धारणाधिकार, कर किंवा इतर कोणतेही देय समाविष्ट आहे; परंतु त्यापुरते मर्यादित नाही. बोलीदाराला या मालमत्तेबाबत स्वतःची योग्य ती काळजी घेण्याचा सल्ला दिला जातो. विक्रीअंतर्गत मालमत्तेसंदर्भात कोणत्याही शुल्क, धारणाधिकार, मालमत्ता कर किंवा इतर कोणत्याही देय रकमेसाठी सिकॉम लि. जबाबदार राहणार नाही. तारखेपर्यंत थकीत असलेले आणि अद्यापि देय नसलेले सर्व वैधानिक दायित्वे/ कर/ देखभाल, शुल्क/ वीज/ पाणी शुल्क, ग्रामपंचायत आणि नगरपालिका शुल्क इत्यादी बोलीदाराद्वारे निश्चित केले जातील आणि यशस्वी बोलीदार/ खरेदीदाराद्वारे ते वहन केले जातील. सिकॉम लि. त्याबद्दल माहिती देण्याची किंवा कोणत्याही स्वरूपाच्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेवर कोणतेही शुल्क देण्याची कोणतीही जबाबदारी घेत नाही.
१५. खरेदीदार/ यशस्वी बोलीदाराची जबाबदारी असेल की, त्यांनी जीएसटी (वस्तू आणि सेवा कर) निश्चित करून भरावा, जो यशस्वी बोलीदार/ खरेदीदाराने देऊ केलेल्या किमतीपेक्षा जास्त असावा.
१६. खरेदीदार/ यशस्वी बोलीदाराची जबाबदारी असेल की, त्यांनी विक्रीच्या मोबदल्याच्या १% (एक टक्का) उत्पन्न करापोटी आय कर भरावा. असा प्राप्तिकर खरेदीदार/ यशस्वी बोलीदाराने सिकॉम यांना प्रस्ताव केलेल्या किमतीपेक्षा जास्त आणि त्याहून अधिक खरेदीदार/ यशस्वी बोलीदाराने भरला जाईल आणि सिकॉम यांना प्रस्ताव केलेली/ बोली किंमत त्यातून कोणत्याही प्रकारची/ प्रकारची कपात न करता मिळेल.
१७. यशस्वी बोली लावणाऱ्याला कायद्यानुसार लागू असलेले कन्व्हेयन्स/ विक्री प्रमाणपत्रासाठी देय असलेले शुल्क/ शुल्क, जसे की स्टॅम्प ड्यूटी, नोंदणी शुल्क, वकिलाचे शुल्क आणि इतर सर्व खर्च, शुल्क आणि खर्च इत्यादींचा भार सोसावा लागेल.
१८. **लिलावाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे :**

| | | |
|---|---|---|
| अ. | मालमत्तेची तपासणी | **दि. १९ मार्च २०२५ स. ११.०० वा. ते दु. ०४.०० वा.पर्यंत.** |
| ब. | इसारा ठेव रकमेसह बोली स्वीकारण्याची आणि देयकाच्या पुराव्यासह कागदपत्रे अपलोड करण्याची शेवटची तारीख | **दि. २४ मार्च २०२५ दु. ०४.०० वा.पर्यंत (दोन्हींसाठी- डीडी किंवा आरटीजीएस/ एनईएफटी)** |
| क. | जाहीर ई-लिलाव - तारीख आणि वेळ | **दि. २५ मार्च २०२५, स. ११.०० वा. ते दु. ०१.०० वा.दरम्यान** |

**मालमत्तेच्या अधिक चौकशीसाठी, कृपया संपर्क साधा**

| | |
|---|---|
| **श्री. मनीष जग्गी** | **टेलि. : (०२२)-६६५७२८५७, मोबाइल - ९६१९२६६३०७, ई-मेल : mjaggi@sicomindia.com** |
| **श्री. अभिजीत कुमार** | **टेलि. : (०२२)-६६५७२७१६, मोबाइल - ७७९८९५६१७२, ई-मेल : akumar@sicomindia.com** |

दिनांक : ०५ मार्च २०२५ — सही/-
ठिकाण : मुंबई — सिकॉम लिमिटेड